# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक ०८.०५.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०७.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १४ ईसमांवर कारवाई करण्यात आली. तसेच, महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून, रूपये १,२६,६००/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२७८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,१०,८००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) कोतवाली पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या महिला आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०७.०५.२०२६ चे १२.३० वा. ते १४.५० वा. चे दरम्यान, कोतवाली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना उधोजी नगर, सर्कल नं. ०६, महाल येथे एक वयोवृध्द महिला संशयीत हालचाली करतांना व तीचे बाजूचे खुर्चीवर वेगवेगळ्या रंगाच्या पन्नीमध्ये काहीतरी संशयीत वस्तु असल्याचे दिसून आले. पोलीस पायदळ त्या महिलेकडे जावु लागले तेव्हा ती घटनास्थळावरून पळून जाण्याचे तयारीत असता, तीला पोलीसांनी ताब्यात घेतले. तीला तीचे नाव पत्ता विचारले असता, तीने आपले नाव चांदबानो मोहम्मद हातम, वय ६० वर्षे, रा. उधोजी नगर, सर्कल नं. ०६, महाल, कोतवाली, नागपूर असे सांगीतले. तीचे ताब्यातील वेगवेगळ्या प्लास्टीक पन्नींची पाहणी केली असता, त्यामध्ये अंमली पदार्थ गांजा एकुण ६४८ ग्रॅम वजनी मिळुन आला. आरोपी महिलेचे ताब्यातुन गांजा, रोख ५८० /—रू. असा एकुण १२,५८०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी महिला ही स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आली. आरोपी महिलेचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब), 11A एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कोतवाली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपी महिलेस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. राहुल मदने पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्रीमती अनिता मोरे सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग), वपोनि. रितेश आहेर यांचे मार्गदर्शानाखाली, पोउपनि. विलास गोरे, खुशाल राठोड, मपोउपनि. शिंदे, पोहवा. प्रसन्ना दापुरकर व त्यांचे पथकाने केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सिताबर्डी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.**

फिर्यादी सुरजकुमार गुरूप्रसाद, वय २७ वर्षे, रा. ग्राम सरेनी कोतवाली, जि. रायबरेली (उ.प्र.) ह.मु. बॅक ऑफ बडोदा जवळ, गोकुलपेठ, नागपूर यांचा मित्र नामे अवधेशकुमार कृष्णकुमार, वय २६ वर्षे, रा. सरेनी कोतवाली जि. रायबरेली (उ.प्र.) यास फिर्यादीने पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, ''टोकीओ बार अॅण्ड रेस्टॉरेन्ट'' येथे तीन महिण्यापुर्वी कॅशियर पदावर नौकरी लावून दिली होती. दिनांक ०७.०५.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मित्र अवधेशकुमार आपल्या कामावर हजर असता, तेथील वेटर आरोपी नामे आयुष सुखबिरसिंग नेगी, वय २४ वर्षे, रा. लुथापुर, पो. लालघाटी, तह. कोटद्वार, जि. पौडी गढवाल (उत्तराखंड) यांचे सोबत शुल्लक कारणावरून वादविवाद झाल्याने, आरोपीने अवधेशकुमार यास जिवानिशी ठार मारण्याच्या उद्देशाने चाकु फेकुन मारून गंभीर जखमी केले. लोकांनी गंभीर जखमी यास उपचाराकरीता ओक्हार्ट हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी अवधेशकुमार यास तपासून त्यास मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी आशितोषकुमार नरेंद्रसिंग बहादुरसिंग, वय ३४ वर्षे, रा. सिंधी कॉलोनी, शुभम किराणा स्टोअर्स जवळ, खामला, राणाप्रतापनगर, नागपूर यांचा बांधकामाचा व्यवसाय असुन, देवप्रत कंन्स्ट्रक्शन नावाचे पोलीस ठाणे बेलतरेडी हद्दीत, एलएलपी मंगलमुर्ती रेसीडेन्सी ए विंग शॉप क्र. ०३, तळमजला, परसोडी, बेलतरोडी, नागपूर येथे ऑफीस व गोडावुन आहे. तेथे फिर्यादी यांनी बांधकामाकरीता लागणारे वेगवेगळ्या एम.एम. चे एकुण १३९ ईलेक्ट्रीक वायर बंडले किंमती ७,५०,०००/—रू. चा मुद्देमाल आणुन, गोडावुन चे एका रूममध्ये लॉक करून ठेवला होता. दिनांक ०६.०५.२०२६ चे १८.०० वा. ते दि. ०७.०५.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीने ठेवलेल्या रूमचे लोखंडी शटरचे लॉक तोडुन, त्यातील ईलेक्ट्रीक वायर बंडले एकुण किंमती ७,५०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे सपोनि. पंकज काकडे ८२७५३९२८१० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३३४(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे हिंगणा:—** दिनांक ०७.०५.२०२६ चे १२.२० वा. चे पुर्वी, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, डोंगरगाव येथील बंद टोल नाक्याजवळ, नागपूर ते वर्धा जाणाऱ्या रोडलगत मोकळ्या जागेतील कडूनिंबाचे झाडाखाली एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ४५ वर्षे वयाचे, वर्णन— रंग सावळा, उंची ५ फुट ३ इंच, बांधा सडपातळ, अंगात पांढऱ्या रंगाचे मळकट फुलबाहीचे शर्ट व काळ्या रंगाचे फुलपॅन्ट तसेच, निळ्या रंगाची अंडरविअर घातलेल्या वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे हिंगणा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोहवा. चेतन बुधवावरे ९९२३१०३५६६ यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कामठी. | ८०/२००३ | कलम ४५७, ३८० भा.दं. वि. | १) समसुद पठाण, रा. कामठी<br>२) मोहम्मद साजीद मोहम्मद युनुस पठाण, रा. इस्माईलपुरा, कामठी, नागपूर.<br>३)कल्लु वहीद पठाण, रा. कामठी, जि. नागपुर. | १५.०५.२०२६ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कामठी. | ९००३३/ २०११ | कलम ४५७, ३८० भा.दं. वि. | १) किसना गुलाब कुरनकर,<br>२) शेख फरीद शेख अदमिया,<br>३)सुरज भैय्यालाल कैराम, तिघेही रा. अब्दुल शहा दर्गा जवळ, कामठी, जि. नागपूर. | १८.०५.२०२६ |
| ३. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कामठी. | ९००२९१/ २०१३ | कलम ८२ सी.आर.पी. सी. प्रमाणे | शेख इमरान वल्द शेख अय्युब, रा. तंबाखु ओळी, कामठी, नागपूर. | १६.०५.२०२६ |

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**